Dnyandeep Mandal's

# ST. JOSEPH COLLEGE OF ARTS & COMMERCE

Satpala, Post- Agashi, Virar (W).
Tal- Vasai, Dist- Palghar -401301

Reaccredited by NAAC – 'B' Grade (2.70 CGPA)

{Affiliated to University of Mumbai}

## Marathi Department

मायबोली  मराठी भाषेचे संवर्धन होणे,ही काळाची गरज आहे - डॉ संजय जगताप

महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार ज्ञानदीप मंडळ संचलित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय सत्पाळा विरार पश्चिम यांच्या मराठी विभागाच्या वतीने आभासी पद्धतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. बुधवार , २६ जानेवारी २०२२ रोजी सदर कार्यक्रमाचे तेरावे पुष्प गुगल मीटच्या माध्यमातून अर्पण करताना व मराठी भाषा प्रेमींना संबोधित करताना मुंबई विद्यापीठाचे पनवेल येथील विभागीय सहसंचालक डॉ संजय जगताप म्हणाले की "  मायबोली  मराठी भाषेचे संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. आपल्या भाषेचे संवर्धन करण्यासाठी आपण स्वतः पासून सुरुवात करायला हवी आणि त्यासाठी अधिक वेळ दिला पाहिजे." 'वारी मराठीची' या विषयासंबंधी  उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ जगताप म्हणाले," सेंट जोसेफ महाविद्यालयाचा आदर्श सर्वच महाविद्यालयानी घेतला तर शासनाने दिलेले अध्यादेश भक्तीपूर्ण वातावरणात अमंलात आणता येतील. कोणताही कार्यक्रम करायचा म्हणून करण्यापेक्षा मनापासून केला तर घवघवीत यश मिळते." शासनाचा  प्रतिनिधी म्हणून मला सेंट जोसेफ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष डिसोझा आणि मराठी विभागातील प्राध्यापक जगदीश संसारे यांचे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वीपणे साजरा करीत असल्याबद्दल कौतुक करताना अभिमान वाटतो आहे, असे गौरवोद्गार डॉ जगताप यांनी सदर कार्यक्रमात शासनाच्या वतीने काढले. कार्यक्रमाचे पाहुणे 'तारक मेहता का उलटा चष्मा' या लोकप्रिय मालिकेत भूमिका करतारे अभिनेते सुनील होळकर यांनी प्रेम विषयक कविता, मालिकेतील मजेदार किस्से सादर करून कार्यक्रम बहारदार केला.होळकरांनी मराठी भाषेतील गमतीजमती सांगून उपस्थितांची वाहवा मिळवली. सदर भावपूर्ण कार्यक्रमात बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ सुभाष आपल्या छोटेखानी भाषणात म्हणाले, " आज मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रमात विभागीय सहसंचालक डॉ संजय जगताप यांनी हजेरी लावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. मराठी भाषेवरील प्रेम असेच टिकवून ठेवले तर मराठी भाषा जगात पोचेल. मराठी भाषेची अवीट गोडी सर्वदूर पसरण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे."

पंधरवड्याच्या तेराव्या  पुष्पाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख सहाय्यक प्राध्यापक जगदीश संसारे यांनी केले आणि पाहुण्यांची ओळख करुन दिली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या स्नेहल कवळी,   आई सी सी महाविद्यालय, खेड येथील प्रा डॉ संजय पाटोळे , शंकर नारायण महाविद्यालय,भाईंदर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. रुचिता देसाई आणि सेंट जोसेफ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर एम एम पी शाह महिला महाविद्यालय (माटुंगा ), जे एस एम महाविद्यालय ( अलिबाग ), शंकर नारायण महाविद्यालय ( भाईंदर),पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय ( विरार ) ,आई सी सी महाविद्यालय ( खेड ) , डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ( महाड)  ४० भाषा प्रेमी विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

ज्ञानदीप मंडळाचे अध्यक्ष फ्रान्सिस तुस्कानो व सर्व पदाधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी विषयात पदव्युत्तर पदवी मध्ये प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मराठीची महती सांगणारा आणि मराठीतील भावगीतांचा 'वारी मराठीची...!" हा बहारदार कार्यक्रम सादर केला. वारी मराठीची या कार्यक्रमाची संकल्पना मेल्वीन डाबरे यांची होती तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एमिल आल्मेडा यांनी केले. कार्यक्रमाची सांगता प्रिया जाधव यांनी सादर केलेल्या पसायदानने करण्यात आली. नेहा धारुळकर, मधुकर तराळे, नीता गोन्साल्विस, सुशिला लोपीस , रेश्मा परेरा यांनी कार्यक्रमात सहभागी होऊन कार्यक्रमात रंगत आणली.

Dnyandeep Mandal's

# ST. JOSEPH COLLEGE OF ARTS & COMMERCE

Satpala, Post- Agashi, Virar (W).
Tal- Vasai, Dist- Palghar -401301
Reaccredited by NAAC – 'B' Grade (2.70 CGPA)
{Affiliated to University of Mumbai}

## Marathi Department

सेंट जोसेफ महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिनाचा आंतरराष्ट्रीय सोहळा रंगला

म... मराठीचा म... माऊलीचा म... माहेराचा म... मातृभाषेचा आणि म... मातीचा यासाठीच केला अट्टाहास असे म्हणत परदेशात राहूनही मातृभाषेची ओढ आणि त्याचे संवर्धन करणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे असे मानणारे, अमेरिका, सिंगापूर, रशिया आणि जर्मन ह्या चार देशातील प्रमुख वक्ते हे ज्ञानदीप मंडळ संचालित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'मराठी राजभाषा गौरव दिना' साठी आभासी पद्धतीने उपस्थित होते. सर्व वक्ते हे आपआपल्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावित असूनही मराठी भाषेचे संवर्धन ही तितक्याच जोमाने परदेशात करीत आहेत. सदर कार्यक्रमात उपस्थित मानवरांचे महाविद्यालयातर्फे स्वागत प्रभारी प्राचार्य डॉ.सुभाष डिसोझा यांनी केले. डॉ सुभाष डिसोझा पाहुण्यांचे कौतुक करताना म्हणाले,"विदेशात राहून मराठीची नाळ जपली आहे, हे खरेच कौतुकास्पद आहे.महाविद्यालय आणि ज्ञानदीप मंडळाच्या वतीने आपणास मानाचा मुजरा! आपली भाषा साता समुद्रापार बोलली जाते याचा सार्थ अभिमान वाटतो आहे." ज्ञानदीप मंडळाचे अध्यक्ष फ्रान्सिस तुस्कानो सर यांनी 'मराठी राजभाषा गौरव दिन' सोहळ्याच्या संदेशरुपी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरूवात अमेरिकेतील मानसशास्त्र अभ्यासक तनुजा प्रधान यांनी मराठी भाषेची महती सांगून आपल्या दोन अलक (अति लघु कथा) मधून भारतीय आणि परदेशी स्त्रीदर्शन घडविले. गेली ३० वर्षे सिंगापूरला वास्तव्य असणारे श्रीरंग केळकर यांनी मातृभाषा दिन आपल्या मातेस अर्पण केला आणि 'माझी आई' ह्या चरित्रपर ग्रंथाचे अभिवाचन करून आईची महती गायिली. डॉ.कल्याणी मसादे ह्या व्यवसायाने डॉक्टर असून रशियात कार्यरत आहेत. सध्या सुरू असलेल्या रशियातील युद्धजनक परिस्थिततही मराठी काव्याशी आपली नाळ कशी जोडली गेली आहे, हे सांगत कुसुमाग्रजांच्या 'गाभारा' या कवितेचे अप्रतिम सादरीकरण केले व त्यानंतर स्वतःची स्वरचित कविता सादर करून उपस्थित सर्व रसिकांची दादही मिळविली. जर्मन येथे स्थायिक असणाऱ्या संगिता पालवे यांनी तनुजा प्रधान लिखित प्रवासवर्णनाचे अभिवाचन केले. त्यांचे अभिवाचन इतके सुरेख होते, की थेट रसिकांना त्यांच्या वाचनातून विदेशी प्रवास व तेथील निसर्गाचा आस्वाद घेता आला. चारही वक्त्यांनी वेगवेगळे साहित्यप्रकार सादर केले. परदेशात राहूनही लेखणीतून मात्र मातृभाषेचे संस्कारच व्यक्त होत होते. चारही देशांच्या वेळा वेगळ्या असूनही मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त भारतीय वेळ सांभाळीत कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत केली.

सदर कार्यक्रमाची संकल्पना सुचविणारे आणि कार्यक्रमाच्या वेळेपर्यंत सर्वकाही सुयोग्यपणे जुळवून आणणारे प्रा.जगदीश संसारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या लाघवी आवाजात कु.माधवी विजयकुमार पवार हिने केले. तर आभार प्रदर्शन डॉ.रश्मी शेटये- तुपे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक,काही इतर महाविद्यालयातील मान्यवर

प्राध्यापक,समाजातील भाषाप्रेमी कादंबरीकार फ्रान्सिस लोपीस शिक्षकेतर कर्मचारी व मोठया संख्येने विद्यार्थींही उपस्थित होते.


ज्ञानदीप मंडळ
ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता
Estd. 1995
ज्ञानदीप मंडळ संचलित
सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय
सत्पाळा, विरार (प.)
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२
निमित्त
मराठी विभाग आयोजित
राष्ट्रीय महिला काव्य संमेलन
'महिला रंगल्या काव्यात'
महिला कवयित्रींच्या कवितांचे सादरीकरण
संकल्पना
जगदीश संसारे
गुरुवार, २७ जानेवारी २०२२, संध्याकाळी ४ वाजता
http://meet.google.com/bky-xbjp-gah
आयोजक
डॉ सुभाष डिसोझा
प्रभारी प्राचार्य
फ्रान्सिस तुस्कानो
अध्यक्ष
राष्ट्रीय महिला काव्य संमेलन
'महिला रंगल्या काव्यात'
निवेदिका
माधवी पवार
प्रणिता बिलोलिकर
जमशेदपुर, झारखंड
वर्षा भावे
जबलपुर, मध्यप्रदेश
अरुणा महेश जाजू
निजामाबाद, तेलंगाना
आसावरी इंगळे
जामनगर, गुजरात
मनिषा पाटील
पालकाड, केरळ
भारती रायबागक
चेन्नई, तामिळनाडू
शिल्पा सकळकळे
गुरुग्राम, हरियाणा
डॉ स्वाती घाटे
जयपूर, राजस्थान
प्रतिमा महाजन
चिकोडी ,बेळगाव
उज्ज्वला बुरुंगले
बीरभूम, पश्चिम बंगाल
साधना आरोंदेकर
डिचोली, गोवा


ज्ञानदीप मंडळ
ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता
Estd. 1995
ज्ञानदीप मंडळ संचलित
सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय सत्पाळा विरार पश्चिम
यांच्या मराठी विभागाच्या वतीने आई क्यु ए सी अंतर्गत साजरा केला जाणार
मातृभाषा दिन
प्रमुख वक्ते : माननीय फेलिक्स डिसोझा, साहित्यिक
विशेष आकर्षण : महाविद्यालयीन विद्यार्थी कुणी घर देता का घर? (नटसम्राट)
तुला शिकवीन चांगलाच धडा( ती फुलराणी) हे नाट्यप्रवेश आपापल्या मातृभाषेत सादर करणार
कधी? सोमवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२२
वेळ? सकाळी १० वाजता?
कुठे? महाविद्यालयाचे सभागृह
निमंत्रक
अंतर्राष्ट्रीय मातृभाषा दिवस

# वसई विकास

वर्ष : १० | अंक १३३ | वसई, जि. पालघर | शुक्रवार दि. २८ जानेवारी २०२२ | पृष्ठ : ८ | किंमत २ रु.

## मायबोली मराठी भाषेचे संवर्धन होणे,ही काळाची गरज आहे – डॉ संजय जगताप

**वसई, प्रतिनिधी**

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार ज्ञानदीप मंडळ संचलित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय सत्पाळा विरार पश्चिम यांच्या मराठी विभागाच्या वतीने आभासी पद्धतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. बुधवार , २६ जानेवारी २०२२ रोजी सदर कार्यक्रमाचे तेरावे पुष्प गुगल मीटच्या माध्यमातून अर्पण करताना व मराठी भाषा प्रेमींना संबोधित करताना मुंबई विद्यापीठाचे पनवेल येथील विभागीय सहसंचालक डॉ संजय जगताप म्हणाले की मायबोली मराठी भाषेचे संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. आपल्या भाषेचे संवर्धन करण्यासाठी आपण स्वतः पासून सुरुवात करायला हवी आणि त्यासाठी अधिक वेळ दिला पाहिजे. वारी मराठीची या विषयासंबंधी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ जगताप म्हणाले, सेंट जोसेफ महाविद्यालयाचा आदर्श सर्वच महाविद्यालयानी घेतला तर शासनाने दिलेले अध्यादेश भक्तीपूर्ण वातावरणात अमंलात आणता येतील. कोणताही कार्यक्रम करायचा म्हणून करण्यापेक्षा मनापासून केला तर घवघवीत यश मिळते.इइ शासनाचा प्रतिनिधी म्हणून मला सेंट जोसेफ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष डिसोझा आणि मराठी विभागातील प्राध्यापक जगदीश संसारे यांचे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वीपणे साजरा करीत असल्याबद्दल कौतुक करताना अभिमान वाटतो आहे, असे गौरवोद्गार डॉ जगताप यांनी सदर कार्यक्रमात शासनाच्या वतीने काढले. कार्यक्रमाचे पाहुणे तारक मेहता का उलटा चष्मा या लोकप्रिय मालिकेत भूमिका करतारे अभिनेते सुनील होळकर यांनी प्रेम विषयक कविता, मालिकेतील मजेदार किस्से सादर करून कार्यक्रम बहारदार केला.होळकरांनी मराठी भाषेतील गमतीजमती सांगून उपस्थितांची वाहवा मिळवली. सदर भावपूर्ण कार्यक्रमात बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ सुभाष आपल्या छोटेखानी भाषणात म्हणाले, इइ आज मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रमात विभागीय सहसंचालक डॉ संजय जगताप यांनी हजेरी लावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. मराठी भाषेवरील प्रेम असेच टिकवून ठेवले तर मराठी भाषा जगात पोचेल. मराठी भाषेची अवीट गोडी सर्वदूर पसरण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. पंधरवड्याच्या तेराव्या पुष्पाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख सहाय्यक प्राध्यापक जगदीश संसारे यांनी केले आणि पाहुण्यांची ओळख करून दिली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या स्नेहल कवळी, आई सी सी महाविद्यालय, खेड येथील प्रा डॉ संजय पाटोळे, शंकर नारायण

पान ७ वर...



## आगामी वसई विरार महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रजा सुराज्य पक्ष सर्व जागा लढवणार

### पक्षाच्या पाचव्या वर्धापन दिनी अण्णासाहेब तिगोटे यांची घोषणा

**वसई, प्रतिनिधी**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिवसाचे औचित्य साधत सकाळी ११.३० वा. बाळा सावंत हुतात्मा स्मारक सभागृह ,पापडी, वसई (प) येथे प्रजा सुराज्य पक्षाच्या पाचव्या वर्धापन दिनाची सुरुवात हुतात्मा स्मारकाला वंदन करून तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून देशाच्या राज्यघटनेचे येथो चित सन्मान करून वर्धापन दिनाची सुरुवात

पान ३ वर...



वर्ष : १० | अंक १५९ | वसई, जि. पालघर | बुधवार दि. २ मार्च २०२२ | पृष्ठ : ८ | किंमत २ रु.

## सेंट जोसेफ महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिनाचा आंतरराष्ट्रीय सोहळा रंगला

**विजय खेतले**

म मराठीचा म माऊलीचा म माहेराचा म मातृभाषेचा आणि म मातीचा यासाठीच केला अट्टाहास असे म्हणत परदेशात राहूनही मातृभाषेची ओढ आणि त्याचे संवर्धन करणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे असे मानणारे, अमेरिका, सिंगापूर, रशिया आणि जर्मन ह्या चार देशातील प्रमुख वक्ते हे ज्ञानदीप मंडळ संचालित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित मराठी राजभाषा गौरव दिनासाठी आभासी पद्धतीने उपस्थित होते. सर्व वक्ते हे आपआपल्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावित असूनही मराठी भाषेचे संवर्धन ही तितक्याच जोमाने परदेशात करीत आहेत.



सदर कार्यक्रमात उपस्थित मानवरांचे महाविद्यालयातर्फे स्वागत प्रभारी प्राचार्य डॉ.सुभाष डिसोझा यांनी केले. डॉ सुभाष डिसोझा पाहुण्यांचे कौतुक करताना म्हणाले, विदेशात राहून मराठीची नाळ जपली आहे, हे खरेच कौतुकास्पद आहे.महाविद्यालय आणि ज्ञानदीप मंडळाच्या वतीने आपणास मानाचा मुजरा! आपली भाषा साता समुद्रापार बोलली जाते याचा सार्थ अभिमान वाटतो आहे. ज्ञानदीप मंडळाचे अध्यक्ष फ्रान्सिस तुस्कानो सर यांनी मराठी राजभाषा गौरव दिनफसोहळाच्या संदेशरुपी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात अमेरिकेतील मानसशास्त्र अभ्यासक तनुजा प्रधान यांनी मराठी भाषेची महती सांगून आपल्या दोन अलक (अति लघु कथा) मधून भारतीय आणि परदेशी स्त्रीदर्शन घडविले. गेली ३० वर्षे सिंगापूरला वास्तव्य असणारे श्रीरंग केळकर यांनी मातृभाषा दिन आपल्या मातेस अर्पण केला आणि माझी आई ह्या चरित्रपर ग्रंथाचे अभिवाचन करून आईची महती गायिली. डॉ. कल्याणी मसादे ह्या व्यवसायाने डॉक्टर असून रशियात कार्यरत आहेत. सध्या सुरू असलेल्या रशियातील युद्धजनक परिस्थितही मराठी काव्याशी आपली नाळ कशी जोडली गेली आहे, हे सांगत कुसुमाग्रजांच्या गाभारा या कवितेचे अप्रतिम सादरीकरण

पान ७ वर...

पान १ वरून...

### सेंट जोसेफ महाविद्यालयात ...

केले व त्यानंतर स्वतःची स्वरचित कविता सादर करून उपस्थित सर्व रसिकांची दादही मिळविली. जर्मन येथे स्थायिक असणाऱ्या संगिता पालवे यांनी तनुजा प्रधान लिखित प्रवासवर्णनाचे अभिवाचन केले. त्यांचे अभिवाचन इतके सुरेख होते, की थेट रसिकांना त्यांच्या वाचनातून विदेशी प्रवास व तेथील निसर्गाचा आस्वाद घेता आला. चारही वक्त्यांनी वेगवेगळे साहित्यप्रकार सादर केले. परदेशात राहूनही लेखणीतून मात्र मातृभाषेचे संस्कारच व्यक्त होत होते. चारही देशांच्या वेळा वेगळ्या असूनही मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त भारतीय वेळ सांभाळीत कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत केली. सदर कार्यक्रमाची संकल्पना सुचविणारे आणि कार्यक्रमाच्या वेळेपर्यंत सर्वकाही सुयोग्यपणे जुळवून आणणारे प्रा.जगदीश संसारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या लाघवी आवाजात कु. माधवी विजयकुमार पवार हिने केले. तर आभार प्रदर्शन डॉ.रश्मी शेटये– तुपे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक, काही इतर महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक,समाजातील भाषाप्रेमी कादंबरीकार फ्रान्सिस लोपीस शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थीही उपस्थित होते.


पान १ वरून...

### विरारमध्ये पुन्हा दिवसाढवळ्या ...

कायदा व्यवस्थेचा प्रश्न निमाण झाला आहे. शनिवारी समय चौहान या तरुणाची भर दुपारी गोळ्या घालून हत्या करण्यात घटना घडल्याच संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. आसाराम राठोड यांच्यावर २२ सप्टेंबर २०२० रोजी देखील दुपारी ३


ज्ञानदीप मंडळ
ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता
Estd. 1995
ज्ञानदीप मंडळ संचलित
सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय
सत्पाळा, विरार (प.)
आई क्यु ए सी अंतर्गत मराठी विभाग आयोजित
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२
पुष्प समारोपाचे : अमेरीकेत मराठीचे स्थान...
वक्ते : लेखक निलेश मालवणकर, मेरीलँड,अमेरीका
शुक्रवार, २८ जानेवारी २०२२
संध्याकाळी ६ वाजता
गुगलमीटवर
जगदीश संसारे
मराठी विभाग प्रमुख
डॉ सुभाष डिसोझा
प्रभारी प्राचार्य
फ्रान्सिस तुस्कानो
अध्यक्ष


Dr. Kallyani
Shrirang
Madhavi
Satej
Tanujaa
archana
Rashmi
Sangita S
Jalsina


ज्ञानदीप मंडळ संचलित
सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय
सत्पाळा, विरार (प.)
आई क्यु ए सी अंतर्गत मराठी विभाग आयोजित
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२
पुष्प तेरावे : वारी मराठीची.....
वक्ते : अभिनेता सुनील होळकर
( तारक मेहता का उल्टा चष्मा )
बुधवार, २६ जानेवारी २०२२
संध्याकाळी ४ वाजता
गुगलमीटवर
जगदीश संसारे
मराठी विभाग प्रमुख
डॉ सुभाष डिसोझा
प्रभारी प्राचार्य
फ्रान्सिस तुस्कानो
अध्यक्ष


ज्ञानदीप मंडळ संचलित
सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय
सत्पाळा, विरार (प.)
मराठी भाषा गौरव दिन
निमित्त
मराठी विभाग
आयोजित
मराठी भाषेचा आंतरराष्ट्रीय सोहळा
साता समुद्रापलिकडील मराठीचे भक्त
संकल्पना
जगदीश संसारे
रविवार, २७ फेब्रुवारी २०२२,
संध्याकाळी ६ वाजता
आयोजक
डॉ सुभाष डिसोझा
प्रभारी प्राचार्य
फ्रान्सिस तुस्कानो
अध्यक्ष
मराठी भाषेचा आंतरराष्ट्रीय सोहळा
साता समुद्रापलिकडील मराठीचे भक्त
तनुजा प्रधान
चालस्टन, अमेरिका
श्रीरंग केळकर
सिंगापूर
निवेदिका
माधवी पवार
संगिता पालवे
जर्मनी
डॉ कल्याणी मसादे
रशिया

## 7.2 - Best Practices

### 7.2.1 - Describe two best practices successfully implemented by the Institution as per NAAC format provided in the Manual.

2 .Marathi Bhasha Samvhardhan Pandharwada

Objectives of the Practice

To aware and to conserve Marathi language.

To introduce importance of Marathi language to non-Marathi speaking students.

The Context,

Department of Marathi organized this program to inculcate significance of Marathi among the young generation. For the same worldwide speakers were invited. Honourable Joint Director, Higher Education, Panvel region Mr. Sanjay Jagtap &

Dr. Kalyani Masade (Russia), Tanuja Pradhan (America), Srirang

Kelkar (Singapore) Nilesh Malvankar (America ) addressed the students.

The Practice

Speakers explained the importance of Marathi language. All the welknown personalities nicely explained roll of Marathi Language in our life.

Evidence of Success

Admission for Marathi Literature continuously has been increased since last two years.













स्मिता पाटील, जूचंद्र कामण भागांतील सामाजिक कार्यकर्ते कै. रामचंद्र म्हात्रे यांच्या कन्या तसेच ससुनवघरचे दानशूर कै. गोविंदशेठ पाटील यांच्या सुना तालुक्याच्या ग्रामीण भागांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गिरिजाराम वेल्फेअर फाऊंडेशन संस्थेच्या त्या उपाध्यक्षा बालयोगी सदानंद महाराज आश्रमाच्या प्रत्येक कार्यक्रमात त्यांचा सक्रिय

बाल संस्कार केंद्राद्वारे मुलांना संस्कारीत करण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. लायन्स क्लब ऑफ जूचंद्र कामण विभाग, महिला दक्षता कमिटी, शिक्षण समन्वय समिती, आगरी समाज विकास परिषद, चंडिका देवी न्यास जूचंद्र आदी संस्थामध्ये त्या कार्यरत आहेत.

यापूर्वी त्यांना वॉक टू गेदर मुंबईचा 'मानव सेवा पुरस्कार' डॉ. सी.एम.शहा मेमोरियल

# फट... फट... फजिती स्पर्धा संपन्न



वसई : वार्ताहर

ज्ञानदीप मंडळ उत्तर वसई संचलित सेंट जोसेफ महाविद्यालयात अत्यंत उत्साही वातावरणात मराठी भाष संवर्धन पंधरवडा उपक्रमांतर्गत फट... फट... फजिती या अभिनव स्पर्धेचे आणि स्वानुभवन कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत धोकादायक संघाने प्रथम क्रमांक पटकाविला, तर भाव आमच्या मनातला आणि सप्तरंग संघांना अनुक्रमे तिसरा व दुसरा क्रमांक मिळाला. स्पर्धेविषयी बोलताना विजेती दक्षता ठाकूर म्हणाली, 'आपल्या फजितीवर हसायला शिकविणारा हा भाषा पंधरवडा सगळ्याच महाविद्यालयात व्हायला हवा' स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी स्वीकारताना सहा.प्रा. वंदना तुस्कानो म्हणाल्या, 'अशा स्पर्धांमुळे आत्मपरीक्षणही करता येते आणि दुसऱ्यावर हसणे किती सोपे असते तेही लक्षात येते.' प्रा. प्रसाद डाबरे, प्रा.कविता आल्मेडा, प्रा. रोमिया कोरीया यांनी आपापली फजिती सांगून मराठी भाषा प्रेमी विद्यार्थ्यांच्या टाळ्या मिळविल्या. प्रा. संगिता पंडित यांनी सांगितलेल्या फजितीला तर विद्यार्थ्यांनी प्रचंड दाद दिली. फट... फट... फजिती या अभिनव स्पर्धेचे कल्पक आयोजन प्रा. जगदीश संसारे यांनी केले होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. अपर्णा नाईक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# औरंगाबाद जिल्ह्यात सापडले गुप्तधन; चांदीची नाणी आणि बरंच काही सापडल्याची चर्चा

औरंगाबाद : वार्ताहर


औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यात गुप्त धन सापडल्याची सध्या जोरदार चर्चा आहे.

# मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबि






काव्य वाचन


काव्य वाचन



